Scholarly Research Journal for Humanity Science & English Language
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2024: 8.058
https://www.srjis.com/issues_data/226
*PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL DEC-JAN 2024, Vol-12/61*
*https://doi.org/10.5281/zenodo.10579357*

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : भाषा विषयक धोरण

**डॉ. विजया पाटील & श्री. रमेश तिप्पाना जाधव**
प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**Paper Received On:** 20 December 2023

**Peer Reviewed On:** 25 January 2024

**Published On:** 01 February 2024

**प्रस्तावना** –

भारताला प्राचीन संस्कृती आणि विचारांची समृद्ध अशी परंपरा लाभली आहे भारतीय विचार आणि तत्त्वज्ञानात ज्ञान, प्रज्ञा आणि सत्याचा शोध ही सर्वोच्च महत्त्वपूर्ण उदिष्टे समजली जातात. भारताने सन २०१५ मध्ये शात विकासाचा कृती कार्यक्रम निश्चित केला त्याअंतर्गत सन २०३० पर्यंत सर्वांसाठी समावेशक आणि समान शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वासाठी निरंतर अध्ययनाच्या याच्या संधींना प्रोत्साहन देश हे चौथ्या क्रमांकाचे उद्दिष्ट असे आहे. एकविसाव्या मतकातील स्वप्नवत आणि आदर्श असे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे या उद्दिष्ठांना आधारभूत मानून मांडले गेले आहे के कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समितीने सखोल अभ्यास आणि नागरिकांच्या हरकती, सूचनांचा विचार करून धोरण अंतिम केले आहे. या धोरणातील भाषा भूमिका ठळकपणे पाहण्याचा इथे प्रयत्न आहे.

निसर्गात मनुष्य हा एकमेव प्राणी आहे, जो स्वतंत्रपणे विचार करू शकतो. मनुष्याचे आणखी एक व्यटक वैशिष्ट्य म्हणजे त्याचा भाषाविकास हजारो वर्षाच्या प्रयत्नातून प्रगतशील माणूस बोलू लागला, लिहू लागला माणसाने छापखान्याचा शोध लावला, भाषा हे माणसाचे संवादाचे

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

आणि संपर्काचे माध्यम झाले. आधुनिक युगात अनौपचारिक शिक्षणापेक्षा औपचारिक शिक्षणाला अधिक महत्व प्राप्त झाले सर्वच औपचारिकः शिक्षणासाठी भाषा प्रभावी माध्यम उपयुक्त ठरले आहे. शिक्षण एकभाषी न राहता बहुभाषी झाले आहे या घोरणातील भाषाविषयक स्वरूप समजून घेण्यापूर्वी या धोरणाची थोडक्यात पार्श्वभूमी पाहू.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पार्श्वभूमी** –

भारतीय शिक्षण व्यवस्थेत चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त, गौतम, पिंगल, शंकरदेव, मैत्रेयी, गार्गी आणि तिब्र असे अनेक विद्वान होऊन गेले. ज्यांनी विविध ज्ञानशाखा आणि जागतिक ज्ञानात मोलाची भर घातली. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर मनुष्याला ज्ञानाचे महत्त्व अधिकच उमगत गेले आहे. त्या अनुषंगाने माणसाने शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःला जिगिषु ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी अवघ्या शंभरेक वर्षापूर्वीही शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झालेले हे वास्तव आहे. मूठभर लोकांनाच शिकण्याचा अधिकार होता. बहुजन समाज हा पारंपरिक कौशल्य व्यवसाय आणि उच्चवर्णीयाच्या सेवेतच आपल्या आयुष्याचे सार्थक झाल्यात धन्यता मानत असे. अक्षरज्ञान आणि ग्रंथाध्यवत बहुजनांपासून कोसो दूर होते. महाराष्ट्रात ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम अशा संत मंडळांनी लोकजागृतीचे प्रयत्न केले संत पंत आणि तत कवींनी ज्ञानयज्ञ संक्रमित ठेवता पण एकोणविसाव्या शतकात महात्मा जोतिराव फुले यांनी शिक्षणाची कोंडी फोडली.

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले । इतके सारे अनर्थ,
एका अविद्येने केले ॥

**आयोगांची भाषाविषयक भूमिका** –

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे निवेदन महात्मा फुलेंनी हटर आयोगासमोर १९ ऑक्टोबर १८८२ रोजी दिले. त्यात 'किमान १२ वर्षे वयापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे' असे सुचविले होते. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीचे हे खऱ्या अर्थाने बीजारोपण होते, नव्या शैक्षणिक धोरणाचा विचार आणि अभ्यास करताना या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार समजून घेतले आणि १८९३ साली आपल्या संस्थानातील अमरेली विभागात प्रायोगिक तत्त्वावर सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाच्या कार्याचा प्रयोग राबवला. बडोदा संस्थानात पुढे १९०६ साली सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाचा अमल सुरु झाला. कोल्हापूर संस्थानात छत्रपती राजर्षी शाहू महाराजानी १९१७ साली मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा कायदा प्रभावीपणे अंमलात आणला, तत्पूर्वी भारत स्तरावर गोपाल कृष्ण गोखले यांनी १९१० साली सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाचा विचार मांडला.

महात्मा गांधीनी मूलोद्योगी शिक्षण अर्थात 'नयी तालीम' ही मन, मेंदू आणि मनगट (3H) विकसित करणारी शिक्षण प्रणाली देशाला दिली. पण आधुनिकीकरणाच्या रेट्यात ती मागे पडली. स्वतंत्र भारतात विद्यापीठ आयोग (१९४८), मुदलियार आयोग (१९८२) आणि कोठारी आयोग (१९६४) हे महत्त्वपूर्ण आयोग शिक्षणविषयक सुधारणा करत आले. १९८६ मध्ये नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले नवा आकृतीबंध आणि नव्या तंत्रज्ञानाचा पुरस्कार करणारे हे धोरण होते. याचबरोबर मुलांच्या मूलभूत क्षमता विकसित करण्यावर भर देणारे हे धोरण होते, उपरिनिर्दिष्ट सर्व शिक्षण प्रणालीमध्ये पायाभूत भाषा विकासाला प्राधान्य दिले गेले. मातृभाषेची ओळख आणि गणिती व्यवहाराचे किमान ज्ञान अपेक्षित होते मातृभाषेसह राष्ट्रभाषा आणि आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीचाही शिक्षणात समावेश केला गेला. यातून भाषा आणि गणित विषयक "समताधिष्ठित अध्ययन संकल्पना विकसित झाली. २००५ सालच्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याने (NCF-२००५) भाषिक कौशल्यांना विस्तारित रूप प्राप्त झाले.

RTE ACT - २००९ ने शालेय शिक्षणात, तर UGC मार्फत उच्च शिक्षणात भाषा विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जागतिक शिक्षणाचा विचार करत भाषा विषयक भूमिका मांडताना दिसते.

**त्रिभाषा सूत्राचा स्वीकार** –

भारताच्या संविधानात २२ भाषांना राजभाषा म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. (भारतीय संविधान भाग १७, कलम ३४३ ते ३४७ व अनुसूची ८) तरीही या भाषांना गंभीर अडचणींना तोंड द्यावे लागते आहे. याशिवाय भारतात ८८० भाषा बोलल्या जातात. त्यापैकी ७८० भाषा नोंदणीकृत

आहेत भारत हा बहुभाषिक देश आहे, हे यावरून स्पष्ट होते. भारत सरकारने १९६८ साली एक शिक्षण ठराव केला, सर्व राज्य सरकारांशी सल्ला मसलत करून शिक्षण व्यवस्थेत त्रिभाषा सूत्र अमलात आणले. १९८६ आणि १९९२ च्या धोरणामध्येही हे सूत्र लागू होते.

महाराष्ट्रात इयत्ता ५ वी पासून त्रिभाषा सूत्र अवलंबिले गेले. यामध्ये प्रथम भाषा म्हणून मातृभाषा (मराठी), 'द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी) आणि तृतीय भाषा म्हणून आतरराष्ट्रीय भाषा (इंग्रजी) यांचा समावेश करण्यात आला. शिक्षणमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यानी इबना १ ली पासून इंग्रजी विषय शिक्षणात आणून धाडसी पाऊल उचलले.

नव्या जागतिक शिक्षणाच्या परिप्रेक्ष्यात भाषा शिक्षणाचा व्यापकतेने विचार करण्यात आला आहे. प्रत्येक राज्यात त्रिभाषा सूत्राच्या अमलबजावणीत फरक दिसून आला आहे. काळानुरूप स्थानिक लोकांच्या आशा, आकांक्षा आणि प्राधान्याचा विचार केला जात आहे. प्रादेशिक, आंतरराज्य आणि जागतिक स्तरावरील भाषिक कौशल्य विद्यार्थ्यांना विकसित होणे आवश्यकच आहे. विद्यार्थी मातृभाषेत सर्वात जास्त प्रभावीपणे शिकतात, हे मानसशास्त्रीयदृष्ट्या खरे आहे. परंतु भाषा शिकणे आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळाना बाढती मागणी असणे, हे आजचे समाज वास्तव आहे.

**भाषा विषयाचे वर्तमान** –

भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या गतिमदतेचे प्रमुख कारण म्हणजे भारताच्या विविध घटकातील वैविष्य होय. हे वैविध्य चालीरीती, परंपरा, खानपान, सांस्कृतिकता आणि वेशभूषा यामध्ये जसे दिसून येते, तसेच ते भाषा व त्यांच्या लिपीमध्येही दिसून येते. त्यामुळे प्रांतवार भाषेच्या अस्मिता जागृत झालेल्या दिसतात, म्हणजे महाराष्ट्रात मराठी भाषेचा अभिमान जागविला जातो. उत्तर भारतात हिंदीचा अधिक प्रचार, तर दक्षिणेत स्वत च्या भाषेबरोबरच जी भाषेवर अधिक भर देणारी राज्ये भारतात दिसून येतात: आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात इलेक्ट्रॉनिक उपकरणे, संगणकीय सॉफ्टवेअर्स आणि मोबाइल ॲप्सद्वारे विविध भाषांच्या लिपी आपल्या समोर येतात.

महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाल्यास मराठी भाषा दैनंदिन व्यवहारात प्रमाणभाषा म्हणून किती वापरली जाते ? याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची वेळ आलेली आहे. आपल्या

मोबाईलमध्ये आपण इंग्रजी भाषेत आपले संपर्क क्रमांक आणि नावे जतन करून ठेवतो आपल्या एकाच वाक्यात मराठी, हिंदी, इंग्रजी अशा तिन्ही भाषाची सरमिसळ झालेली दिसते भाषाच्या तत्सम आणि तद्भव शब्दाच्या संक्रमणामुळे विशिष्ट भाषेच्या शुद्धतेला | हरताळ फासला जातोय. जनव्यवहार भाषेच्या बाबतीत गंभीर नाही, असेच आजूबाजूला दिसून येते, जे बोलण्याच्या बाबतीत तेच लिहिण्याच्या बाबतीत रस्त्यावरील दुकानावरील पाट्या पाहिल्या की आपल्या भाषांचे वर्तमान आपणास कळून गावे 'येथे इस्ती करूण मिळेल अशी पाटी वाचून मराठी अभ्यासक व्यथित होतो. बेलांटी, उकार अक्षरे याबद्दल शिक्षित लोकही बेजबाबदार दिसतात.

शालेय स्तरावर मुलाच्या इंग्रजी शिक्षणाकडे पालकाचा कल वाढता आहे. आरंभिक बाल्यावस्थेतच मातृभाषेतील शब्द वापराऐवजी मुलाने इंग्रजी शब्द उच्चारणे पालकाला प्रतिष्ठेचे वाटते. मूल परात मराठी बोलते. शाळेत औपचारिक इंग्रजी शिकते आणि दूरदर्शन चैनेलवर हिंदी कार्यक्रम पाहते मुलाने बहुभाषिक होणे समर्थनीय आहे. पण भाषेच्या गुणवत्तेचे काय ? हा प्रश्न उरतो भाषेच्या माध्यमातून मुलाचे स्व. आविष्करण कसे होते, हे महत्त्वाचे आहे. बोली भाषाचा वापर कमी होत आहे. परिणामी बोली भाषा नष्ट होण्याचे प्रमाण वाढत आहे. मराठीसह प्रत्येक भारतीय भाषेसमोरील सध्या हे आव्हानच आहे. दुर्दैवाने मराठी शिकवणाच्या बहुतांश शिक्षक, प्राध्यापकाची मुलेच कॉन्व्हेंटमध्ये शिकताना आढळतात इथेच भाषा शिक्षणाच्या आत्मविश्वासाचा अभाव प्रकर्षाने जाणवतो शालेय स्तरावर भाषाविषयक कौशल्यविकास हा व्यक्तिसापेक्ष आणि अल्प दिसून येतो. ११ नोव्हेंबर २०२१ रोजी संपूर्ण भारतात राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS National Achievement Survey) इसत्ता ३री ५ वी ८.बी आणि १० वी या वर्गासाठी यादृच्छिक पद्धतीने घेण्यात आले. मे २०२२ मध्ये या सर्वेक्षणाचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यानुसार महाराष्ट्रातील प्रावीण्य व प्रगत स्तरामध्ये इयत्तानिहाय अनुक्रमे ४४%, ४८%, ४१% आणि ४६% असे विद्यार्थी दिसून येतात. याचा अर्थ भाषाविकास सुधारणेला अद्याप संधी आहे. तसेच त्रिभाषा सूत्रातील हिंदी या औपचारिक विषयाला गोरा स्थान दिले जात असल्याचे निदर्शनास येत आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - भाषा विकास अंतर्भाव** –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० प्रमुख चार भागात विभागले गेले आहे, ते चार भाग खालील प्रमाणे-

भाग एक : शालेय शिक्षण

भाग दोन : उच्च शिक्षण

भाग तीन : विचार करण्याचे इतर महत्त्वाचे केंद्रीय मुद्दे

भाग चार : अंमलबजावणी

वरील चार भागांचा विचार करता प्रत्येक भागात भाषाविषयक धोरणाची भूमिका आणि भाषा विकासाचा अंतर्भावः नव्याने कसा केला आहे. गाथा विचार करता येतो. शैक्षणिक धोरणाच्या प्रस्तावनेत २२ मूलभूत तत्त्वे स्पष्ट केली आहेत त्यातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या मूलभूत साक्षरतेस प्राधान्य देणे आणि अध्यापनात व अध्ययनात बहुभाषिकत्त्व तसेच भाषा शक्ती यांना प्रोत्साहन देणे ही प्रमुख तत्त्वे भाषाविषयक भूमिकातत्त्वे म्हणून निर्देशित केली आहेत. त्याचा भागनिहाय विचार केल्यास समग्र चित्र दृष्टिगोचर होण्यास मदत होईल.

**भाग एक : शालेय शिक्षण** –

नव्या धोरणात ५ + ३ + ३ + ४ अशा नव्या आकृतीबंध आणि अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून ३ ते १८ या वयोगटाला समाविष्ट करण्यात आले आहे. प्रारंभिक बाल्यावस्थेची तीन वर्षे आणि इयत्ता पहिली व दुसरी मिळून शिक्षण होईल. या स्तरावर खेळ, जिज्ञासा आणि कृतीवर आधारित लवचिक शिक्षणाचा विचार केला आहे. भाषा विकासासाठी अक्षरे, भाषिक कोडी नाटक बोलक्या बाहुल्या, बडबडगीते, संवाद आणि प्रारंभिक भाषा साक्षरतेचे उपक्रम यांचा समावेश केला आहे.

पुढचा इयत्ता तिसरी ते पाचवी हा तीन वर्षांचा कालावधी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानावर विशेष भर देणारा आहे. सध्या प्राथमिक स्तरावरील सुमारे पाच कोटीपेक्षा अधिक विद्यार्थी मूलभूत भाषा आणि गणिती क्षमतानो अप्राप्त आढळले आहेत. ही उणीव भरून काढण्यासाठी FLN (Foundational Literacy and Numeracy) मिशनची स्थापना मनुष्यबळ विकास मंत्रालय (MHRD) करत आहे. विद्यार्थ्याच्या भाषा विकास कौशल्यासाठी ही मोठी पूरक ठरणारी बाब आहे. पुढच्या सर्व माध्यमिक स्तरापर्यंतच्या विद्याथ्र्यांसाठी प्रेरणादायी आणि मनोरंजक पुस्तके पुरवली जाणार आहेत. सर्व स्थानिक आणि भारतीय भाषांमध्ये ती अनुवादित होऊन उपलब्ध होणार आहेत. शालेय आणि सार्वजनिक वाचनालयात अशी पुस्तके मोठ्या प्रमाणात

उपलब्ध होणार आहेत. वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी चळवळ उभारली जाणार आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून डिजिटल वाचनालय देखील स्थापन करण्यात येणार आहेत. 'बुकक्लबा सारखी योजना सार्वत्रिक करण्यात येणार आहे. पुस्तकांचे गाव भिलारचे अनुकरण अन्य गावांनी करावे यासाठी प्रोत्साहनपर योजना आखण्यात येणार आहेत. बहुभाषिक आणि विविधांगी पुस्तकाचा विद्याथ्र्यांना परिचय होईल. त्यातून विद्यार्थी वैश्विक नागरिक बनण्याचे पहिले पाऊल टाकेल, अशी अपेक्षा आहे.

बालकाची बोलण्याची भाषा आणि शिकवण्याचे माध्यम यात तफावत असेल तर शिकण्यात अडथळा निर्माण होतो, आदिवासी भागात विविध बोली भाषांचा वापर होतो तिथे शिकवणाऱ्या शिक्षकाचे शिकवणे मात्र प्रमाण भाषेत होत असते. यामुळे बालक बिथरते. भाषा बोलण्यास संकोचते यासाठी शक्यतो पाठ्यपुस्तकामध्ये बालकाच्या घरातील बोली / स्थानिक भाषा / प्रादेशिक भाषा किंवा मातृभाषेचा अधिकतर समावेश असेल. शिक्षणाचे माध्यम नसणारीही भाषा विद्यार्थ्यांनी शिकावी, यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्याचा भाषाविकास गतीने होतो. हे सिद्ध झाले आहे. एकापेक्षा अनेक भाषा प्रभावीपणे आत्मसात करण्याचे वय हे २ ते ८ वर्षांचे असते, असे भाषा अभ्यासकांचे मत आहे.

**भाषाविषयक ठळक बाबी** –

याशिवाय शालेय स्तरावर भाषा विषयक धोरणातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत –

१. सुरुवातीला मातृभाषेचे वाचन आणि लेखन शिकवले जाईल.

२. इयत्ता ३ री पासून पुढे अन्य भाषांचे वाचन व लेखन शिकवले जाईल.

३. भाषासूत्रात सर्वाधिकता येईल कोणतीही भाषा कोणत्याही लादली जाणार नाही.

४. तीन भाषांपैकी कोणत्याही दोन भारतीय भाषांची निवड विद्यार्थी करू शकतील.

५. गणित आणि विज्ञान विषयाची पुस्तके मातृभाषा आणि इंग्रजी अशी द्विभाषिक रूपात उपलब्ध करण्यात येतील.

६. भाषासूत्रात संस्कृत भाषेचाही पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे.

७. इयत्ता ६ वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांना पारंपरिक भाषा आणि तिच्याशी संबंधित साहित्याचा अभ्यास करण्याची संधी देण्यात येईल.

८. माध्यमिक स्तरावर इंग्रजीसह कोरियन, जपानी, थाई, फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज आणि रशियन वा परदेशी भाषा शिकण्याच्या संधी उपलब्ध होतील.

९. भाषांच्या सांस्कृतिक पैलूशी सांगड घालण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित ॲप्स आणि विविध खेळांच्या उपक्रमाचा समावेश अनुभवात्मक शिक्षणासाठी केला जाईल.

१०. श्रवण अक्षम मुलांसाठी भारतीय सांकेतिक भाषा प्रमाणित केली जाईल ही एक विशेष बाब आहे. यासाठी विशेष अभ्यासक्रम साहित्य विकसित करण्यात येईल, भाषा विकास आणि भाषेच्या सार्वत्रिकीकरणासाठी हे आवश्यक पाऊल आहे.

**भाग २ : उच्च शिक्षण** –

विद्यमान उच्च शिक्षणाच्या मर्यादा लक्षात घेऊन नव्या शैक्षणिक धोरणात मूलभूत आणि क्रांतिकारी बदल सुचविण्यात आले आहेत. बहुविषयक आणि बहुशाखीय महाविद्यालये आणि विद्यापीठांची रचना हे एक प्रमुख वैशिष्ट्य नव्या धोरणात दिसून येते विद्यार्थ्यास अनेक विद्याशाखीय विषयांची निवड करून आपल्या क्षमता, आवड, कल आणि वृत्तीचं शिक्षण घेण्याचं स्वातंत्र्य या धोरणामुळे लाभणार आहे. भाषेचा विद्यार्थी संगीताचा, अर्थशास्त्राचा अभ्यास शकणार आहे. विज्ञान किंवा वाणिज्य शाखेचा विद्यार्थी भाषा अभ्यास स्वेच्छेने करू शकणार आहे जागतिक शिक्षणाच्या परिमाणात ही बाब विशेष लक्षणीय ठरणारी आहे. विद्यापीठ किंवा महाविद्यालयामध्ये तीन हजार किवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी प्रवेशित झाले की अशी विद्यापीठे / महाविद्यालये बहुशाखीय दर्जाची होतील उच्च शिक्षणाच्या संरचनेसंबंधी उच्च शिक्षण संस्था (HEIS- Higher Education Institutions) स्थापन करण्यात येतील. धोरण व्यवस्थेत जे मुख्य बदल सुचवले आहेत. त्यातील पहिलाच मुद्दा हा भाषा विषयक धोरणाचा आहे तो असा - ९.३ (a) 'उच्च शिक्षण व्यवस्थेच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात किमान एक मोठे बहुशाखीय विद्यापीठ किंवा महाविद्यालय असेल आणि संपूर्ण भारतात उच्च शिक्षण संस्थांचे जाळे निर्माण होईल, ज्याची शिकवण्याची भाषा किंवा कार्यक्रमाचे माध्यम स्थानिक भाषा किंवा भारतीय भाषा असेल.'

भाषा, वाक्य, तत्त्वज्ञान, भारतविद्या, भाषांतर आणि दुभाषीकाम या विषयांचे विभाग सर्व उच्च शिक्षण संस्थामध्ये स्थापन केले जातील आणि भारतीय शिक्षणास चालना दिली जाईल जर असे

विषय वर्गात शिकण्यासाठी मर्यादा येत असतील तर ODL (Online Distance Learning) पद्धतीनेसुद्धा सर्व पदवी अभ्यासक्रमांमध्ये या विषयांचा समावेश करण्यात येईल.

**भाग ३ : विचार करण्याचे इतर महत्वाचे केंद्रीय मुद्दे** –

या भागात 'भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन' हा स्वतंत्र मुद्दा अधोरेखित करण्यात आला आहे भाषा हा घटक कोणतीही कला आणि संस्कृतीचा अविभाज्य घटक ठरतो. कला आणि संस्कृतीला मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे संक्रमित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भाषेच्या माध्यमातूनच होते. संगीत, साहित्य, नाटक, चित्रपट अशा सर्व कलांचा आस्वाद भाषेशिवाय घेण्यास मर्यादा आहेत. भाषेची समज आणि तिच्या जानामुळे डोळसपणे कलांचा आस्वाद घेणे सुलभ जाते. भारतीय संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि प्रसार करणे यासाठीही भाषा विषयाचा गांभिर्याने विचार राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आला आहे.

संविधानाच्या आठव्या अनुसूचीतील २२ भाषांचे अध्यापन आणि अध्ययन प्रत्येक स्तरावर शाळा आणि उच्च शिक्षणाशी एकात्मिक करता येईल, असे प्रयत्न धोरणाने सुचवले आहेत. साहित्य अकादमी आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास (NBT-National Book Trust) या संस्था भारतीय भाषामधील साहित्याचे अनुवाद, भाषांतर करत आहेत. या उपक्रमासह भाषा अध्ययन साहित्य, मुद्रण साहित्य आणि जगातील भाषांमधील महत्त्वपूर्ण साहित्याचे अनुवादही गतीने आणण्याचा प्रयत्न राहील.

भारतात अभिजात भाषा आणि साहित्याचा अभ्यास करणाऱ्या संस्था आणि विद्यापीठे आहेत. येथील भाषा संशोधकांनी परिश्रमपूर्वक प्राप्त केलेली हजारो हस्तलिखिते अद्यापही दुर्लक्षित आहेत. या सर्व हस्तलिखितांचा अभ्यास करून त्यांचे जतन करण्यात येईल. या हस्तलिखितांचे भाषांतर करून सर्व अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी यांना ते उपलब्ध होतील असा प्रयत्न करण्यात येणार आहे. सर्व भारतीय भाषा आणि संस्कृत शिकवणाऱ्या संस्थांना, विभागांना बळ देण्यात येणार असल्याचा पुनरुच्चार धोरण करते आहे.

आदिवासी भाषा, अभिजात भाषा आणि नामशेष होत चाललेल्या भाषाचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी तंत्रज्ञान आणि क्राऊडसोर्सिंगची महत्त्वाची भूमिका असेल, असेही धोरणाने सूचित केले आहे.

**भाग ४ : भाषाविषयक धोरणाची अंमलबजावणी** –

भाषा हा शिक्षणाचा मूलभूत घटक असल्याने भाषाविकास आणि प्रसाराच्या अंमलबजावणीसाठी नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत. या तरतुदींच्या अंमलबजावणीचे स्वरूप सर्वसाधारणतः पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. प्राथमिक स्तरावर 'मूलभूत साक्षरता याबाबत उच्च गुणवत्तेच्या संसाधनांचे एक राष्ट्रीय भांडार डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर फॉर नॉलेज शेअरिंग (DIKSHA) अर्थात दीक्षा अप उपलब्ध करण्यात येत आहे. यामुळे शिक्षक, विद्यार्थी यांना येणारे भाषिक अडथळे दूर होण्यास मदत होणार आहे.

२. एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमातर्गत भारतीय भाषा आणि विद्यार्थ्यांची मातृभाषा यांचा समन्वय आणि संवाद साधण्याचा उपक्रम सुरु झाला आहे. या अंतर्गत देशातील १०० पर्यटनस्थळे निश्चित करण्यात येत आहेत. महाराष्ट्र आणि जोडीशा या दोन राज्यांमध्ये भाषा आणि संस्कृती समजून घेण्यासाठी प्रतिबद्ध गट तयार करण्यात आला आहे. इयत्ता ६ वी ते ८ वी वयोगटातील मुलांसाठी हा आनंददायी उपक्रम सुरु आहे. आकाशवाणीवरून उडीया भाषेची ओळख करून देणारे कार्यक्रम प्रसारित होत आहेत. द्विभाषिक पुस्तिकाची निर्मिती होत आहे. परंतु विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविताना मूल्यांकनाचा आग्रह नसल्याने उपक्रमाचे सादरीकरण व प्रसारण एवढेच प्रत्यक्षदर्शी दिसून येते.

३. केंद्रस्तरावर NCERT आणि राज्यस्तरावर SCERT या विद्याविषयक संस्थावर दर्जेदार पाठ्यपुस्तके व अध्ययन- अध्यापन साहित्य विकसित करण्याची जबाबदारी आहे.

४. शालेय स्तरावर भाषा विषयक मूल्यांकन करण्यासाठी NCERT च्या माध्यमातून राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षण (NAS-National Achievement Survey), राज्य निष्पत्ती सर्वेक्षण (SAS- State Achievement Survey) आणि जिल्हा निष्पत्ती सर्वेक्षण (DAS. District Achievement Survey) करण्याचे नियोजन सुरु झाले आहे. यादृच्छिक पद्धतीने काही शाळामध्ये प्रायोगिक तत्त्वावर असे मूल्यांकन करण्यात आले आहे.

५. उच्च शिक्षणात भाषा व साहित्य या संबंधित कार्यक्रम आणि या कार्यक्रमासाठी लागणारा निधी HEIs (उच्च शिक्षण संस्था) यांच्याकडे असणार आहे. या कार्यक्रमाच्या अमलबजावणीची जबाबदारी HEIs यांची असेल.

६. दोन भाषांमध्ये किंवा स्थानिक / भारतीय भाषामध्ये शिकवणाऱ्या HEIS ना आर्थिक मदत आणि शिष्यवृत्त्यांची तरतूद आहे.

७. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशन (NRF) यांच्या सहाय्याने संशोधन आणि नाविन्याचा शोध घेण्यात येणार आहे.

८. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ ट्रान्सलेशन अँड इंटरप्रिटेशन (IITI) या संस्थेची स्थापना भाषांतर आणि दुभाषी तसेच संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

९. भाषा अध्ययन - अध्यापनासाठी DIKSHA, SWAYAM आणि SWAYAMPRABHA अशा ई-लर्निंग डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे.

**भाषा शिक्षकाची घडण आणि भूमिका** –

नागरिकांच्या पुढील पिढीला शिक्षक आकार देत असतो. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणातील मूलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षक असला पाहिजे असे विचार मांडले आहेत. शिक्षकाला सर्व पातळ्यांवर समाजातील सर्वात आदरणीय आणि आवश्यक सदस्य म्हणून पुनर्स्थापित करण्यासाठी धोरणाने शिक्षकाची भूमिका महत्त्वपूर्ण मानलेली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षक समृद्ध असणे ही आवश्यक पूर्वअट आहे. त्यादृष्टीने 'शिक्षक शिक्षणास' या धोरणात प्राधान्य दिल्याचे दिसून येते. विशेषत: भारताच्या समृद्ध विविधतेचा, संस्कृतीचा आणि भाषा विविधतेचा शिक्षकास अभिमान आणि आत्मविश्वास असायला हवा असा शिक्षक विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने 'वैश्विक नागरिक बनवायला सक्षम ठरेल, असा मूलभूत सिद्धात धोरणात मांडला आहे.

भाषा शिक्षकाबाबत धोरणात पुढील बाबी निर्देशित केल्या आहेत.

१. मूलभूत भाषा साक्षरतेबाबत शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

२. भाषा विषयासाठी पुरेशा शिक्षकांची नियुक्ती करणे.

३. अखंड व्यावसायिक विकास (CPD Continuous Professional Development) अंतर्गत शिक्षकाने स्वतःचा भाषाविकास वृद्धींगत करणे.

४. शालेय व उच्च शिक्षण स्तरावर स्थानिक भाषेचे ज्ञान असणाऱ्या शिक्षकास प्राधान्य देणे.

५. भाषा शिक्षकांसाठी यापुढे चार वर्षांचा एकात्मिक B. Ed. अभ्यासक्रम, तर भाषा विषयात बॅचलर पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांचा B. Ed अभ्यासक्रम आणि चार वर्षांचे पदवीपूर्व शिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांसाठी एक वर्षांचा B. Ed. अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात येत आहे.

६. शिक्षकाच्या बहुशाखीय आणि बहुभाषीय शिक्षणाला आणि संकल्पनात्मक विकासाला बळकटी देण्याची कार्यवाही सुरू होत आहे.

७. देशभरातील विद्यापीठांच्या PhD अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली जात आहे. ती अधिक संशोधनात्मक व उपयोजनात्मक होईल याकडे शासन आणि प्रशासन व्यवस्थेचा कटाक्ष आहे.

८. राष्ट्रीय मार्गदर्शक आयोगाची (NMM) स्थापना करण्यात येत असून भारतीय भाषांमध्ये शिकवायची क्षमता असणाऱ्या वरिष्ठ किंवा निवृत्त अध्यापकांचा मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षणात सहभाग घेण्यात येत आहे.

९. भारतात कुशल भाषा शिक्षकाची तीव्र टंचाई आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी व्यापक आराखडा करण्यात येत आहे.

**समारोप** –

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२०' संपूर्ण देशभरात कार्यान्वित झाले आहे. या धोरणातील भाषाविषयक भूमिकेची समग्र चर्चा अत पर करण्यात आली आहे. प्रारंभिक बाल्यावस्था ते उच्च शिक्षण काळातील विद्यार्थ्याच्या भाषा विकासाबाबत या धोरणात अत्यंत सजगता दिसून येते, ही आशादायक बाब आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाची व्यापकता लक्षात घेता भाषाविषयक सर्व तरतुदी एकाच वेळी अंमलात आणणे अशक्य आहे, हेही समजून घ्यायला हवे नव्या बाबींचा प्राधान्यक्रम लावून

टप्प्याटप्प्याने त्यांना कार्यान्वित करणे इष्ट व व्यवहार्य ठरणारे आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात 'बहुभाषिकता' हाही मुद्दा अधोरेखित होताना दिसत आहे. इयत्ता सहावी ते आठवी या पूर्व माध्यमिक शिक्षण स्तरावर भारतीय बहुभाषा आणि माध्यमिक शिक्षण स्तरावर म्हणजे इयत्ता नववी ते बारावी वर्गासाठी विदेशी बहुभाषांच्या अध्ययन-अध्यापनाचा समावेश केला आहे. तथापि या दोन्ही स्तरावर समाविष्ट बहुभाषाचा किमान अभ्यास असणाऱ्या शिक्षकांची उपलब्धता करणे, हे व्यवस्थेसमोरील आव्हान असणार आहे. अंमलबजावणीच्या टप्प्यावर अशी विविध आव्हाने समोर येणार आहेत. त्यांचा सामना करत हे स्वप्नवत धोरण प्रत्यक्षात अवतरणे ही सर्वांसाठी कसोटी आहे. सन २०४० ओलांडले की या धोरणाची अंतिम फलनिष्पत्ती हाताशी येईल तोवर भारतीय भाषा संवर्धन, जतन, प्रसार आणि प्रचार कार्यात सर्वांनी आपापल्या क्षमतेने योगदान देणे हितावह ठरणारे आहे.

**संदर्भ सूची** –

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार (मराठी)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१६ च्या मसुद्यासाठी काही आदाने, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार (मराठी)

महात्मा फुले समग्र वाक्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, संपादक-धनंजय कीर, डॉ. स. ग. मालसे आणि य. दि. फडके, आवृत्ती ६ बी २००६

*https://hindi.news18.com/news/education/delhn.economic survey-emphasis-on-patriotic-*अभ्यासक्रम-आणि-नवीन-शाळा-शिक्षण-बोर्ड-*4152962.html*

भारतीय भाषा व साहित्य. डॉ. सुनीलकुमार लवटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, सप्टेंबर २००७.

**Cite Your Article as:**

*Vijaya Patil & Ramesh Tippana Jadhav. (2024). RASHTRIYA SHAIKSHNIK DHORAN 2020: BHASHA VISHYAK DHORAN. In Scholarly Research Journal for Humanity Science & English Language (Vol. 12, Number 61, pp. 22–34). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10579357*

*Copyright@2024 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*